# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/06/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील कांद्री बस स्टॉप वार्ड क्र. 5 कन्हान येथे दिनांक 14/06/2021 चे 18.00 वा. ते 18.15 वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे– रविन्द्र रामकृष्ण पोटभरे याने त्याचा मित्र नामे– रंजित उईके याला 5,000/–रू. उधारीने दिलेले होते. फिर्यादी हि रविन्द्र सह रंजितला पैसे मागण्याकरीता गेले असता मित्राने उधारीचे 5000/– रू परत दिले तेव्हा आरोपी क्र. 1) दिपक पोटभरे, रा. कांद्री, वार्ड नं 05 कन्हान हा दारू पिउन तेथे आला व दारूचा नशेत फिर्यादी व फिर्यादीच्या मुला जवळ येउन जुन्या भांडणाचा कारणावरूण फिर्यादी सोबत वाद विवाद केले. यानंतर आरोपी क्र 1 याने फिर्यादीच्या हातातिल 5,000/–रू. हिसकावले असता फिर्यादीचा मुलाने आरोपीस त्या बाबत हटकले असता आरोपी क्र. 1 व आरोपी क्र 2) प्रकाश पोटभरे यांनी फिर्यादीच्या मुला सोबत झगडा भांडण करून हातबुक्कीने मारहाण केली व हातात लोखंडी पाईप घेउन फिर्यादी जवळ येउन त्यास लोखंडी पाईपने मारून जखमी केले. तेव्हाच फिर्यादीचा मोठा मुलगा नरेंद्र हा तेथे भांडण सोडविण्यास आला असता आरोपी क्र 3) सुरेश पोटभरे हा तेथे आला आणी त्याने आरोपी क्र 2 याचा हातातील लोखंडी पाईप घेवुन फिर्यादी व फिर्यादीचा मोठा मुलगा नरेंद्र या दोघांना लोखंडी पाईपाने डोक्यावर हातावर पायावर मारून जखमी केले. तसेच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व फिर्यादीचा मुलाला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंबरते मो नं 8485861442 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– फिर्यादी नामे– गं भा मुक्ताबाई मारोती भोसकर, वय 70 वर्ष, रा. दहेगाव खापरी ता सेलु जि. वर्धा हि वयोवृध्द असुन ती निराधार योजनेचे पैसे घेण्याकरीता बुटीबोरी बॅकेत आली होती. तिला वेळ झाल्याने ती तिच्या मुलीच्या घरी जायला निघाली. दिनांक 04/06/2021 चे 12.00 वा. मौजा बोरखेडी नाका शिवार येथे फिर्यादी ही मुलीच्या गावी जि वर्धा येथे जात असता ऑटो स्टॅडवर आली तेव्हा ऑटो चालक आरोपी नामे– विनोद बंडु गेडाम, वय 32 वर्ष, रा. समर्थ नगर, नागपूर याने फिर्यादीला "मी केळझर येथे सोडून देतो, म्हणुन ऑटोत बसवले" व तिला जंगलात सुनसान जागी नेवुन तिला हातबक्कीने मारहाण केली. यानंतर आरोपीने तिच्या गळयातील 4 ग्रॅम सोन्याची गरसोली कि 12,000/–रू. कानातील 3 ग्रॅम चे बिऱ्या कि. 9,000/–रू. व नाकातील सोन्याचा खडा कि 1,000/–रू. व नगदी 4,000/–रू. असा एकुण 26,000/–रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मोरखेडे मो.क्र. 8208751249 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावरील मौजा कोठारी लेआउट उमरेड येथे दिनांक 23/04/2021 चे 18.30 वा. ते 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सलमान अली अन्वर अली, वय 38 वर्ष, रा. कोठारी ले आउट उमरेड हयांचे घरी संशयीत आरोपी नामे– 1) गुलाम रायत अली व 2) नजु रायत अली दोन्ही रा. पतीबाजार ईराणी डेरा ईटारशी जि. होशंगाबाद (म. प्र.) हे पाहुणे म्हणुन आले होते. फिर्यादी हे घरी हजर नसतांना फिर्यादीचे घरातील कपाटातील ड्राव्हरमध्ये जुने वापरते पत्नीला लग्नात घातलेले 30 ग्रॅम सोन्याची पोत किं. 90,000/–रू. व नगदी 70,000/–रू. असा एकुण 1,60,000/–रू. चा माल उघडे असलेल्या कपाटातुन चोरी करून घेवुन गेले असावे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 380, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ ईश्वर जोधे मो नं 9823115373 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर